महाराष्ट्र शासन

# जलसंपदा विभाग

**अधीक्षक अभियंता (दरवाजे) यांचे कार्यालय**

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक-422 004 दूरध्वनी (परिमंडळ) : 0253 2534466
E-mail : nasikzone_wrd@yahoo.co.in

जा.क्र.मसंसं(द)/परिमंडळ/आ-२/**१६१**/सन २०२५ दिनांक : २८/३/२०२५

**प्रति,**
**अधीक्षक अभियंता व प्रशासक**
**लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,**
**जळगांव.**

**विषय :** **गट-क संवर्गातील आरेखक पदावरून प्रमुख आरेखक पदावर पदोन्नतीचे शिफारसपत्र देणे बाबत.**

**संदर्भ :**
१ शासन, ज.सं.वि.परिपत्रक क्र.संकीर्ण-२००७/(४२१/२००७)/आ(अतां) दि.२३.११.२००७
२ शासन सा.प्र.वि.निर्णय क्र.एसआरव्ही-१०८९/प्र.क्र.१५/८९/१२, दि.१६/१०/१९९०
३ शासन सा.प्र.वि.निर्णय क्र.एसआरव्ही-१०८९/प्र.क्र.४/९५/१२, दि.१८/१२/१९९५
४ शासन,जलसंपदा विभाग,निर्णय क्र.सुमात-२०१२/प्र.क्र.३०६/२०१२/आ(अतां) दि.२१ मार्च २०१३
५ शासन सा.प्र.वि.निर्णय क्र.वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दि.२ जून २०१४
६ शासन सा.प्र.वि.निर्णय क्र बीसीसी-२०१८/प्रक्र-४६७A/१६-ब दि. ११/१०/२०१८
७ शासन, वित्त विभाग, निर्णय क्र अर्थ-२०२०/प्रक्र ६५/अर्थ-३ दि. ४/५/२०२०
८ शासन सा.प्र.वि.निर्णय क्र बीसीसी-२०१८/प्रक्र-३६६-/१६-ब दि. ७/५/२०२१
९ परिमंडळीय विभागीय पदोन्नती समितीची बैठक क्र.८९, दि. १३/३/२०२५
१० परिमंडळीय पत्र क्र. मसंसं(द)/परिमंडळ/आ-२/ १३४/सन २०२५ दि. १७/३/२०२५
११ अध्यक्ष, नागरी सेवा मंडळ, नाशिक यांची बैठक क्र २ दि. २४/३/२०२५
१२ आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.लाक्षेविप्रा/आस्था-१/ ११४३ दि.२३.४.२०२५.
१३ या कार्यालयाचे समक्रमांकाचे शिफारस पत्र मसंसं(द)/परिमंडळ/आ-२/१६१/सन २०२५ दि.२८.३.२०२५.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र ९ नुसार परिमंडळीय पदोन्नती समितीत मंजुर केलेल्या निवडसुचीनुसार व संदर्भ क्र ११ चे नागरी सेवा मंडळाचे शिफारस पत्रानुसार पदोन्नतीस पात्र ठरविलेल्या उमेदवारांपैकी **सोबतच्या विवरणपत्र-१ मधील उमेदवारांची शिफारस नियुक्ती आदेश निर्गमित करणेसाठी संबंधीत मंडळाकडे करण्यांत येत आहे.**

**१. पदोन्नतीचे आदेश निर्गमित करतांना खालील अटी पदोन्नती आदेशाचा एक भाग असतील.**

१) सदर पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचिका क्र २७९७/२०२१५ मध्ये दि. ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबितअसलेल्या याचीका क्र २८३०६/२०१७ वरिल मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२) सदर पदोन्नती ही सर्वोच्च न्यायालयाने श्री.सबरवाल, श्री.विरपालसिंग चौहान व अजितसिंग जुनेजा यांच्या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयाधिन राहील.

३) सदर पदोन्नती मधील दिव्यांग आरक्षणाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल दावा क्र ६८१९/२०२१ व १०८७६/२०२१ रिट याचिकांच्या निर्णयांच्या अधीन राहील.

४) अन्य कोणत्याही न्यायालयातील पदोन्नतीच्या संदर्भातील निकालाच्या अधीन राहुन सदरील तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र एसआरव्हि-१०१९/प्रक्र३७/९९/१६-अ दि. ५ मार्च २००२ मधील निर्देशाच्या अधीन राहुन सदरील तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

६) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र बिसीसी-२००१/१८८७/प्रक्र६४/०१/१६-ब दि. २५ मे २००४ मधील निर्देशाच्या अधीन राहुन सदरील तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र ८ मधील तरतुदींचे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

७) जर पदोन्नतीच्या कालावधीत न्यायालयीन प्रकरण किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव कर्मचाऱ्यास पदावनत करण्याची आवश्यकता भासली, तर संबंधीतांना कोणतीही नोटीस न देता पदावनत करण्यांत येईल.

८) या कर्मचाऱ्यांना देण्यांत आलेली ही पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार संबंधीत मंडळ कार्यालयाने राखुन ठेवावेत.

९) पदोन्नताने सदर पदासाठी आवश्यक असणाऱ्या विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

१०) मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीवर हजर होतांना जातीच्या प्रमाणपत्राची व जात वैधता प्रमाणपत्राची मूळप्रत / सत्यप्रत संबंधीत कार्यालयास सादर करावी. त्याशिवाय सदर कर्मचाऱ्यास पदोन्नतीवर रुजु करुन घेऊ नये. या आदेशात नमूद प्रवर्ग मूळ प्रमाणानुसारच आहे याची खात्री करावी. तफावत आढळून आल्यास, रुजु करुन घेऊ नये.

११) सदर पदोन्नती व नेमणुकांबाबत राजकिय दबाव आणल्यास, म.ना.सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम २३ व ३(३) याचा भंग होत असल्यामुळे संबंधीतांवर नियमानुसार योग्य कार्यवाही करण्यांत येईल.

१२) ही पदोन्नती कर्मचाऱ्यांच्या बाबतीत (त्यांना लागु असल्यास) वयाच्या ५०/५५ नंतर घ्यावयाच्या पुर्नविलोकन संबंधीचा शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यांत येत आहे.

१३) वरील पदोन्नतांनी पदोन्नती करिता स्विकृती / अस्विकृती हे आदेश पदोन्नती मिळाल्याच्या दिनांकापासून (१५) दिवसांचे आत प्रतिवेदने सादर करावीत.

१४) संबंधित मंडळास विनंती करण्यांत येते की, त्यांनी पदोन्नतास हे आदेश प्राप्त होताच कार्यमुक्त करावे आणि पदोन्नतांनी सदरील पदावर शासन पाटबंधारे विभाग, परिपत्रक क्रमांक पीएनई-१०७२/९२३८८/आ(२), दिनांक १५/१२/१९७२ मध्ये अंतर्भुत केलेल्या आदेशाच्या अटीनुसार कार्यमुक्तीनंतर कार्यावर त्वरीत रुजु व्हावे. त्याचप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२/९/२०१६ च्या अनुषंगाने कार्यवाही करण्यांत येईल. त्यांची दि. २/३/२०१९ नुसार देण्यांत आलेली आश्वासित प्रगती योजनेनुसार पदोन्नतीतील वेतनश्रेणी रद्द करण्यांत येईल व त्यानुसार अनुषंगीक कार्यवाही मंडळ स्तरावरुन करण्यांत येईल. सदर कर्मचाऱ्याने पदोन्नतीच्या ठिकाणी हे शिफारस पत्र निर्गमीत होण्याच्या दिनांकापासुन विहित कालावधीत रुजु व्हायचे आहे. कर्मचारी रुजु न झाल्यास सदर आदेश रद्द करणेत येईल तद्नंतर मानीव दिनांकाबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

१५)भविष्यात परिमंडळांतर्गत विभाग / उपविभाग बंद झाल्याने वरील पदोन्नत कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्यांना बदलीवर परिमंडळाबाहेर / खात्याबाहेर जावे लागल्यास, ते सध्याच्या पदोन्नतीचा आधार घेवून न्यायालयात जाणार नाही असे बंधपत्र त्यांचेकडून ते पदोन्नतीवर कार्यमुक्त / हजर होण्यापूर्वी दुय्यम प्रतीत लिहुन घेऊन त्यावर संबंधित अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता यांची प्रतिस्वाक्षरी घेऊन बंधपत्राची एक प्रत या कार्यालयास पाठवावी.

१६) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पीएवाय-१०८२/व्हीआरा-११०० एक एसटीआर-३, दि.६.११.१९८४ नुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांनी वेतन निश्चिती संबंधीत आपला विकल्प पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासुन एक महिन्याचे आत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास, वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(१)ए अन्वये करणेबाबत संबंधीत मंडळांनी कार्यवाही करावी.

१७) संबंधीत कर्मचारी यांच्या पदोन्नतीवरील पदस्थापनेनंतर मुख्यालयात बदल होत असल्यास, त्यांना नियमाप्रमाणे पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.**तसेच पदस्थापनेचे शिफारस पत्र हे संबधित मंडळ कार्यालयाने कळविलेल्या रिक्त पदांनुसार देण्यात येत आहे.सदर मंडळ कार्यालयात पदोन्नतीचे रिक्त पद उपलब्ध नसल्यास पदोन्नतीचे शिफारस पुन:श्च परिमंडळ कार्यालयास पाठवावे.**

१८) सदर कर्मचाऱ्याच्या बाबतीत निवडसुची तयार करतांना मंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नसल्याचे कळविल्याने संबंधीत कर्मचाचाऱ्यास ताप्तूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यांतआलेली आहे. कर्मचारी सध्या ज्या मंडळाकडे कार्यरत आहे. त्यांनी विभोगीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणाबाबतचे प्रमाणपत्र कर्मचारी कार्यमुक्त होण्यापुर्वीच संबंधीत मंडळाला पोहोचेल हे पहावे व अशा प्रमाणपत्रानुसार विभागीय चौकशी अथवा शिस्तभंग कार्यवाही /न्यायालयीन प्रकरण सुरू नसल्याची खात्री झाल्याशिवाय नविन नियुक्तीच्या ठिकाणी त्यांना हजर करुन घेवु नये.

१९) शासन निर्णयान्वये पदोन्नतीचा लाभ देण्यापूर्वी ३१ मार्च रोजीचे मत्ता व दायित्व विषयक विवरणपत्र सादर केले नसल्यास, त्यांना पदोन्नती देवू नये असे आदेशित केलेले आहे. सोबतच्या तक्त्यातील उमदेवारांनी ३१ मार्च २०२४ रोजीचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र सादर केले असल्याचे खातरजमा करून घ्यावी.

२०) शासन पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, सामान्य प्रशासन विभाग दि.२९/१२/२०१७ च्या पत्रानुसार कर्मचा-यांनी पदोन्नती आरक्षणाचा लाभ घेतला किंवा नाही तसेच स्थायित्व प्रमाणपत्र याची नियुक्ती आदेश देण्यापूर्वी खात्री करण्यात यावी.

२१) मंडळ कार्यालयाकडुन कळविलेल्या पदोन्नतीचे रिक्त पदाच्या मागणीनुसार शिफारस पत्र निर्गमीत करण्यांत येत आहे. शिफारस केलेल्या ठिकाणी जागा रिक्त नसल्यास सदर शिफारशीबाबत परिमंडळ कार्यालयास अवगत करण्यांत यावे.

२२)पदोन्नतीचे शिफारसपत्र दिलेल्या संबधित विवरणपत्रातील कर्मचाऱ्यास पदोन्नती दिलेल्या संबंधित मंडळ कार्यालयाने कर्मचाऱ्याने पदोन्नती स्विकारल्याची खातरजमा केल्यानंतर पदोन्नतीच्या ज्येष्ठता यादीत संबधित कर्मचाऱ्याचे नाव समाविष्ठ करण्यासाठीची शिफारस दिल्यानंतरच त्या कर्मचाऱ्याचे नाव पदोन्नती दिलेल्या पदावरील ज्येष्ठता सुचीत समाविष्ठ केले जाईल.

तसेच संदर्भ क्र.१२ अन्वये सदर कर्मचाऱ्याचे वेतनस्तर देणेबाबत विनंतीनुसार संदर्भ क्र.१३ चे शिफारस पत्र ऐवजी प्रस्तुत समक्रमांकाचे शिफारस पत्र पुन:श्च देणेत येत आहे.

**स्थळप्रत मा.अ.अ.यांना मान्य**

**सोबत :- विवरणपत्र - १**

( ज्ञा.वि.कहाणे )
उपविभागीय अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक

**प्रत** : अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ,नाशिक
यांना माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित

# नाशिक परिमंडळ, नाशिक
## विवरणपत्र-१

**विषय : गट-क संवर्गातील आरेखक पदावरून प्रमुख आरेखक पदावर पदोन्नतीचे शिफारसपत्र देणे बाबत.**

**संदर्भ :- १. विभागीय पदोन्नती समिती बैठक क्र ८९ दि. १३/३/२०२५**

**२. नागरी सेवा मंडळ, नाशिक बैठक क्र २ दि.२४/३/२०२५**

| अ. क्र. | जेष्ठता सूची क्रमांक ३१.१२.२०२३ अखेर | पदोन्नती दिलेला संवर्ग | वेतनस्तर | कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नांव (सर्वश्री) | सामाजिक आरक्षण | | सध्या कार्यरत असलेल्या मंडळ कार्यालयाचे नांव | शिफारस केलेले मंडळ कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नती साठी शिफारस दिलेला प्रवर्ग | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १ | प्रमुख आरेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | संजीव भिमराव वाघ | अ.जाती | खुला | अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नाशिक | **अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिककरण, जळगांव** |

**स्थळप्रत मा.अ.अ.यांना मान्य**

( ज्ञा.वि.कहाणे )
उपविभागीय अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व
परिमंडळीय अधिकारी, नाशिक परिमंडळ,
दिंडोरी रोड, नाशिक